जा.क्र./जिपसा/पशुसं/तां/ ३१६१/२०१६-१७
पशुसंवर्धन विभाग, जि.प.सांगली
दिनांक:- २३/११/२०१६

प्रति,

पशुधन विकास अधिकारी (विस्तार)
पंचायत समिती (सर्व)

**विषय:- सन- २०१६-१७ मध्ये जिल्हा परिषद स्वीयनिधी लोकनेते राजारामबापू पाटील ५० टक्के अनुदानावर शेळीगट (१० शेळी + १ बोकड) वाटप करणे अंतर्गत योजना राबविणेसाठी करावयाच्या कार्यवाही बाबत.**

वरील विषयास अनुसरुन कळविणेत येते की, **सन- २०१६-१७ मध्ये जिल्हा परिषद स्वीयनिधी लोकनेते राजारामबापू पाटील ५० टक्के अनुदानावर शेळीगट (१० शेळी + १ बोकड) वाटप करणे**, ही योजना राबवावयाची आहे. आपल्या तालुक्यासाठी खालील तक्त्यात दर्शविल्या नुसार लक्ष देणेत आले आहे. तसेच सोबत सदर योजनेचे विहीत नमुन्यातील अर्जाची प्रत जोडलेली आहे. तरी सदर अर्जातील दिलेले निकष अवलोकनी घेऊन परिपूर्ण अर्ज संबधीत अर्जदाराकडुन भरले असलेचे खात्री करुन अर्ज स्वीकारणेत यावेत. **तालुकास्तरावर अर्ज स्वीकारणेची मुदत दिनांक:-२३/११/२०१६/२०१६ ते २२/१२/२०१६ राहील. अर्ज या कार्यालयास सादर करावयाची मुदत दिनांक:- २४/१२/२०१६ पर्यंत राहील.** तालुकास्तरावर प्राप्त होणा-या अर्जाच्या नोंदी अद्यावत ठेवाव्यात. तसेच प्राप्त होणारे अर्ज रोजच्या रोज तपासुन सोबतच्या विहीत नमुन्यातील स्कुटनी फॉर्म EXLSHEET मध्ये परिपूर्ण माहीती भरुन लाभार्थींचे अर्जा सोबत या कार्यालयास दिलेल्या मुदतीत सादर करणेत यावे. तसेच EXL फाईल सॉप-ट व हार्ड कॉपी DVB-TTSUREKHA फाऊन्ट मध्ये सादर करावी.

**तालुकानिहाय लक्ष खालीलप्रमाणे**

| अ.क्र. | तालुका | दिलेले उद्दीष्ट |
|---|---|---|
| १ | मिरज | २३ |
| २ | कवठेमहांकाळ | १० |
| ३ | जत | २३ |
| ४ | आटपाडी | ९ |
| ५ | खानापूर | ९ |
| ६ | तासगांव | १४ |
| ७ | वाळवा | २३ |
| ८ | शिराळा | ११ |
| ९ | पलुस | ९ |
| १० | कडेगांव | ९ |
| | एकूण | १४० |

**सोबत :-**

१) विहीत नमुन्यातील अर्ज .
२) योजनेचे प्रारुप
३) स्कुटनी फॉर्म विहीत नमुना

जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
जिल्हा परिषद सांगली